भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२०१२-१३/३३४**
**आरपीसीडी.आरआरबी.बीसी.क्र.५२/०३.०५.३३/२०१२-१३** डिसेंबर १४, २०१२

सर्व प्रादेशिक ग्रामीण बँका

प्रिय महोदय/महोदया,

**प्रादेशिक ग्रामीण बँकांद्वारे, मुदत ठेवी, दैनंदिन ठेवी किंवा आवर्ती ठेवींची, मुदत ठेवींमध्ये पुनर्गुंतवणुक करण्यासाठी रुपांतरण**

ठेवींवरील व्याजदरांवरील विद्यमान सूचनांच्या अनुसार, ठेवीदाराने तशी विनंती केल्यास, मुदत ठेव, दैनंदिन ठेवीच्या स्वरुपातील ठेव किंवा आवर्ती ठेव बंद करुन, त्या ठेवींमध्ये असलेल्या रकमेची, त्याच बँकेत, आणखी एका मुदत ठेवीत रुपांतरण करण्यासाठी आरआरबींनी परवानगी द्यावी. अशा मुदत ठेवीच्या बाबतीत, आरआरबींनी, दंड म्हणून व्याज कमी न करता, व्याज देणे आवश्यक आहे. मात्र अशा वेळी, अशी पुनर्गुंतवणुकीची ठेव, त्या बँकेत, मूळ ठेवींच्या उर्वरित कालावधीपेक्षा अधिक कालासाठी ठेवल्या गेल्या पाहिजेत.

(२) विद्यमान असलेल्या विनियामक नॉर्म्सचे पुनरावलोकन केल्यावर आणि अधिक चांगले ॲसेट लायाबिलिटी मॅनेजमेंट (ए एल एम) ठेवण्यासाठी, असे ठरविण्यात आले आहे की, बँकांना, अशा ठेवींच्या रुपांतरणाबाबत त्यांची स्वतःची धोरणे तयार करण्यास ताबडतोब परवानगी देण्यात यावी.

आपली
(बीना अबदुल रहमान)
उप महाव्यवस्थापक.

ग्रामीण नियोजन आणि कर्ज विभाग, केंद्रीय कार्यालय, १० वा मजला, केंद्रीय कार्यालय इमारत, पो.बॉ क्र. १००१४, मुंबई - 400001,
दुरध्वनी : ९१-२२-२२६१ ०२६१, फॅक्सः ९१-२२-२२६२ १०११/२२६५ ८२७३/२२६५ ८२७६, ईमेल : cgmicrpcd@rbi.org.in

**सावधानतेचा इशारा :** बँक खात्याचा तपशील पासवर्ड ह्यासारखी वैय्क्तिक माहिती मागविण्याबाबत, आरबीआय, कधीही ईमेल्स, एसएमएस पाठवत नाही किंवा फोन ही करत नाही. आरबीआय, कोणाचा निधी ठेवून घेत नाही किंवा देऊ करत नाही. कृपया या प्रकारच्या कोणत्याही ऑफर्सना प्रतिसाद देऊ नका.